औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची दिनांक ३१.५.९४ रोजी झालेल्या ९१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] श्री. ईश्वरराव भोसीकर | सभापती औरंगाबाद मंडळ. |
| २] श्री. भास्कर मुंढे | उपसभापती औरंगाबाद मंडळ. |
| ३] श्री. दे. हि. मून<br>उपसंचालक, नगररचना विभाग, औरंगाबाद. | सदस्य |
| ४] श्री. गायकवाड<br>शहर अभियंता<br>आयुक्त, म. न. पा. औबाद<br>यांचे सदस्य प्रतिनिधी | सदस्य प्रतिनिधी. |

श्री. व्यंकटराव देशपांडे उर्फ बबरु चारठाणकर सदस्य औरंगाबाद मंडळ हे बैठकीस अनुपस्थित होते.

विषय क्र. १: दिनांक १८.२.९४ रोजी झालेल्या ९० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणेबाबत.

.....

१] मंडळाच्या ९० व्या बैठकीतील विषय क्र. २ व ठराव क्र. ५४० वर चर्चा करतांना मा. सभापतींनी कौठा नांदेड येथील गृहनिर्माण योजनेच्या सद्यस्थितीबाबत विचारणा केली.

उपसभापतींनी यावर खुलासा करतांना असे सांगितले की, कौठा नांदेड येथील गृहनिर्माण योजनेसाठी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यांत आली होती. त्यास अनुसरुन १३१ अर्ज प्राप्त झाले आहे. तसेच प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे मंजूरीस्तव पाठविला आहे. प्रशासकीय मान्यता मिळाल्यास पुढील कार्यवाही करता येईल असे उपसभापतींनी सांगितले.

२] मंडळाच्या ९० व्या बैठकीतील विषय क्र. ३ व ठराव क्र. ५४१ वर चर्चा करतांना उपसभापतींनी मंडळास माहिती दिली की, गृहनिर्माण भवनाजवळील १६ उच्च उत्पन्न गट गाळयांच्या उर्वरीत कामाचे आदेश देण्यांत आले आहेत व काम प्रगतीपथावर असून अंतिम टप्प्यात आहे.

दिनांक १८.२.९४ च्या ९० व्या बैठकीतील कार्यवृत्तांतवर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५४६

दिनांक १८.२.९४ च्या ९० व्या बैठकीतील कार्यवृत्तांवर सविस्तर चर्चा होऊन सदरचा कार्यवृत्तांत कायम करण्यात आला.

विषय क्र. २: तुळजापूर [जि. उस्मानाबाद] विकास योजनेमधील, प्राधिकरणाच्या मालकीची आरक्षण क्र. ३ दुकान केंद्रासाठी आरक्षीत जमिन नगरपरिषदेस हस्तांतर करणेबाबत.

...

सदर बाब टिप्पणी उपसभापतींनी मंडळास वाचुन दाखविली. या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५४७

तुळजापूर [जि. उस्मानाबाद] विकास योजनेमधील, प्राधिकरणाच्या मालकीची आरक्षण क्र. ३ दुकान केंद्रासाठी आरक्षीत असलेली जागा अंदाजे क्षेत्रफळ १९०० चौ.मी. नगरपरिषदेने रुपये २,५०,८००/- मंडळाकडे भरणा केल्यामुळे नगरपरिषदेस हस्तांतर करण्यास मंडळाने मान्यता दिली.

विषय क्र. ३: जालना येथील स.क्र. ४३०, ४३१ मधील सोसायटी भूखंडासाठी राखीव असलेल्या जागेबाबत नियोजीत कलावती मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था म. जालना यांनी केलेल्या मागणीबाबत.

---

सदर विषयाची बाब टिप्पणी उपसभापतींनी मंडळास वाचुन दाखविली. जालना येथील मंडळाच्या ताब्यातील स.क्र. ४३० [भाग], ४३१ [भाग] ह्या जागेवर अल्प उत्पन्न गट योजने अंतर्गत ९४ भूखंडाची योजना हाती घेतलेली आहे. याच जागेपैकी ४ भूखंड हे सोसायटी भूखंड म्हणून राखीव आहे. त्या भूखंडापैकी एक भूखंड सदर संस्थेने मागितला आहे. परंतु जाहिरात दिल्याशिवाय सोसायटी भूखंडाचे वाटप करता येणार नाही असे उपसभापतींनी सांगितले.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५४८

जालना येथील स.क्र. ४३० [भाग], ४३१ [भाग] या जमिनीवर आरक्षित असलेल्या ४ सोसायटी भूखंडाच्या वाटपासाठी वर्तमानपत्रातुन जाहिरात देण्यांत यावी व जाहिरातीनुसार भूखंडाची मागणी करावी असे कलावती मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था म. जालना यांना कळवावे.

विषय क्र. ४: बीड व नांदेड नगरपालिकेकडून प्राप्त झालेल्या झोपडपट्टी सुधारणा कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे-बाबत.

उपरोक्त विषयाची बाब टिप्पणी उपसभापतीनी मंडळास वाचुन दाखविली.

अ] बीड नगरपालिकेने १] बॅक साईड ऑफ हौसिंग बोर्ड कॉलनी इंदिरानगर व २] बार्शीरोड, बार्शीनाका बीड या झोपडपट्टीतील सुधारणा कामाचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविले आहे. सदर झोपडपट्टया राजपत्रात दिनांक १०.१०.८५ रोजी घोषित झालेल्या आहेत व त्यांची अंदाजपत्रकीय किंमत अनुक्रमे रुपये १०, ४६, १११ व ७, ९३, ४०४/- आहे त्यास नियमानुसार अनुक्रमे ७, ५३, ००० व ५, ५३, ०००/- प्रशासकीय मान्यता प्रदान करता येते.

बीड शहरासाठी सन १९९४-९५ या आर्थिक वर्षात रु. १५.०० लक्षाची तरतुद प्रस्तावित आहे.

मंडळाने चर्चेअंती असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५४९

बीड येथील बॅक साईड ऑफ हौसिंग बोर्ड कॉलनी इंदिरानगर व बार्शीरोड-बार्शी नाका या झोपडपट्टयांच्या सुधारणा कामास खालील अटीच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.

१] बॅक साईड ऑफ हौसिंग बोर्ड कॉलनी-इंदिरानगर या झोपडपट्टीच्या सुधारणा कामास नियमानुसार रु. ७, ५३, ००० चो व बार्शीरोड-बार्शीनाका या झोपडपट्टी सुधारणा कामास नियमानुसार रु. ५, ५३, ०००/- प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२] नगरपरिषदेने त्यांच्या हाती असलेल्या जुन्या कामांना प्राथमिकता देऊन व त्यांनाच निधीच्या उपलब्धतेनुसार प्रतिपुर्तीकरण्यांत येईल व प्रस्तावित योजनांना अतिरिक्त निधी उपलब्ध झाल्यास अथवा निधीच्या उपलब्धतेनुसारच प्रतिपुर्ती करण्यांत येईल.

[ब] नांदेड

नांदेड न.प. ने [१] पार्ट ऑफ असदुल्लाबाद स.न. ६१ पौर्णीमानगर व [२] स.न. ३७ व ६१ ऑफ असदुल्लाबाद या झोपडपट्टयाचे सुधारणा कामाचे प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव मंडळाकडे पाठविले आहे. सदर झोपडपट्टया राजपत्रात अनुक्रमे १०.१०.८५ व १६.१२.९३ रोजी घोषित झालेल्या आहेत. न.प. ने सादर केलेले अंदाजपत्रके अनुक्रमे रू. ८,४९,४०७ ची असुन नियमानुसार रू. ८,४९,४०७ ची प्रशासकीय मान्यता देता येणी शाक्य आहे व दुसरे ३,०१,७११ चे असुन नियमानुसार त्यास रू. ३,००,९५८ ची प्रशासकीय मान्यता देता येणी शाक्य आहे.

नांदेड शाहरासाठी सन १९९४-९५ या आर्थिक वर्षात रू. १०.०० लक्षाची तरतुद प्रस्तावित आहे. न.प.च्या हाती सध्या अंदाजे रू. २.२५ लाखाची कामे आहेत सब '९४-९५ ची तरतुद पुर्णपणे खार्च होण्यास्तव प्रशासकीय मान्यता देता येणी शाक्य आहे.

करिता मंडळाने चर्चेअंती असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५५०

नांदेड येथील १] पार्ट ऑफ असदुल्लाबाद स.न. ६१ पौर्णीमानगर व २] स.न. ३७ व ६१ ऑफ असदुल्लाबाद, पीरनगर या झोपडपट्टयाच्या सुधारणा कामांना अनुक्रमे रू. ८,४९,४०७ व रू. ३,००,९५८ ची प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

विषय क्र. ५: मा. सभापतीच्या परवानगीने आयत्या वेळेस येणारे विषय.

विषय क्र. १: औरंगाबाद मंडळाच्या कार्यालयीन इमारतीच्या रक्षणासाठी सेक्युरिटी सर्व्हीसेस नेमणेबाबत.

...

सदर विषयाची बाब टिप्पणी उपसभापतीनी मंडळास वाचुन दाखविली व मंडळास कल्पना दिली की, मंडळाकडे इमारतीच्या रक्षणासाठी चौकीदार

नसल्याने इमारतीच्या रक्षणाची अडचण निर्माण झालेली आहे व एका वयवृध्द चौकीदाराकडून २४ तास रक्षणाचे काम करून घेणे शक्य नाही. मंडळाच्या आस्थापनेवर चौकीदारांची नियुक्ती करण्यासाठी प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठविला होता परंतु अद्याप त्यास मंजूरी मिळालेली नाही. मंडळाच्या कार्यालयात कॅम्प्युटर, टेलिफोन इत्यादी किंमती साहित्य असल्यामुळे इमारतीच्या रक्षणासाठी खाजगी सेक्युरिटी सर्व्हीसेस नेमण्यांत यावे असे म. उपसभापतींनी सांगितले.

म. उपसभापतींनी सांगितले की, मेडीयटर्स व अजिंठा सेक्युरिटीज प्रा. लि. या संस्थेची नेमणूक करण्याचा प्रस्ताव पुर्वी प्राधिकरणास सादर करण्यात आला आहे. पण त्याला अजुन मान्यता आली नाही. आपण माहे ऑगष्ट ९३ मध्ये ४ सेक्युरिटीज संस्थांकडून कोटेशन मागविले होते.

१] मेडीयटर्स व अजिंठा सेक्युरिटीज प्रा. लि.

२] हिंदुस्थान सेक्युरिटी सर्व्हीसेस

३] पांडे सेक्युरिटी सर्व्हीसेस

४] विष इन्टरप्राईजेस.

या संस्थांनी नमुद केलेले दर पाहिले असता मेडीयटर्स व अजिंठा सेक्युरिटीज प्रा. लि. यांचे दर थोडेसे जास्त आहे. तथापी या संस्थेचा अनुभव व विश्वासर्हता पाहिली असता मराठवाड्यातील एक चांगली संस्था आहे असे दिसुन येते. त्यांनी सादर केलेल्या त्यांच्या क्लॉयंटची यादी पाहिली असता १२ शासकीय कार्यालयामध्ये त्यांनी सेवा पुरविलेल्या आहेत. तसेच सार्वजनिक क्षेत्रातील ३२ नामांकीत कंपन्यामध्ये व खाजगी क्षेत्रातील १२ कारखान्यामध्ये मराठवाडाभर सेवा पुरविलेली आहे. विश्वासर्हता व प्रमाणीक सेवा प्राप्त व्हावी हा हेतुन समोर ठेवुन मे. मेडीयटर्स व अंजिठा सेक्युरिटीज प्रा. लि. या संस्थेचे कोटेशन मंजूर करावे असे म. उपसभापतींनी सांगितले.

यावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने खालील प्रमाणे ठराव मंजूर केला.

<u>ठराव क्र. ५५१</u>

मे. मेडीयटर्स व अजिंठा सेक्युरिटीज प्रा. लि. या संस्थेचे रू. १८०० [अक्षरी अठराशे फक्त] प्रतिमाह प्रतिगार्ड या दराने कोटेशन मंजूर करण्यांत यावे व तीन सेक्युरिटी गार्डची २४ तास सेवा कार्यालयासाठी वापरावी.

यासंबंधी मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी त्वरीत कार्यवाही करावी.

सदर प्रस्ताव कार्योत्तर मंजूरीसाठी प्राधिकरणाकडे पाठविण्यांत आला.

विषय क्र. २: उच्च उत्पन्न गटा अंतर्गत २६ गाळे
आर ४३ सिडको औरंगाबाद गाळे वाटपाबाबत.

....

या विषयाची बाब टिप्पणी उपसभापतींनी मंडळास वाचुन दाखविली व सदर गृहनिर्माण योजनेच्या उर्वरीत बांधकामाबाबत येणाऱ्या अडचणी बैठकीत विषद केल्या. तसेच या योजनेचे लाभधारक गाळे पुर्ण करून मिळण्यासाठी सतत पाठपुरावा करीत आहे.

यावर मंडळाच्या सदस्यांनी सांगितले की, गाळ्यांची अंतिम किंमत निश्चीत करुन गाळे आहे त्याच स्थितीत गाळेधारक घेण्यास तयार असल्यास त्यांच्याकडून संम्पती घेऊन गाळे वाटप करावे.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५५२

२६ गाळे उच्च उत्पन्न गट आर ४३ सिडको औरंगाबाद या योजनेतील गाळ्यांची किंमत निश्चीत करून सदर गाळे आहे त्या स्थितीत लाभधारक घेण्यास तयार असल्यास त्यांच्याकडून संम्पतीपत्र घेऊन गाळे वाटप करावे.

विषय क्र. ३: औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या
वसुलीबाबतचा अहवाल.

ठराव क्र. ५५३

औरंगाबाद मंडळाने १९९३-९४ या वर्षात केलेल्या व माहे एप्रिल ९४ च्या वसुलीबाबत समाधान व्यक्त केले व त्यासंबंधी नोंद घेतली.

यटलावरील विषय संपल्यानंतर उपस्थितांचे आभार मानून सभा संपली.

...